**कृपया प्रसिध्दिसाठी** **7मार्च 2009**

## राम नाईक यांच्या उपस्थितीत उत्तर मुंबईत भाजपाच्या बुथ समित्यांचे संमेलन

**मुंबई,शनिवार:**"एकीकडे महागाई, आर्थिक मंदी यावर उपाययोजना करण्यात काँग्रेस सरकार पूर्ण अपयशी ठरले आहे, तर दुसरीकडे सत्तेवर नसतानाही महापूर, बॉम्बस्फोट अशा प्रसंगी भाजपाचे कार्यकर्ते पीडित जनतेला सर्वतोपरी मदत करीत आहेत. केंद्रात सत्तेवर नसतानाही भाजपा हे काम करीत आहे, या कार्यांची माहिती भाजपाच्या कार्यकर्त्यांनी तळागाळाच्या मतदारांपर्यंत पोहचवावी," असे प्रतिपादन माजी केंद्रिय पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज येथे केले. भारतीय जनता पार्टी, उत्तर मुबई जिल्ह्याच्यावतीने उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील सहाही विधानसभांचे काम बघण्यासाठी प्रत्येक बुथसाठी समिती नेमण्यात आल्या आहेत. या बुथ समिती कार्यकर्त्यांची विधानसभावार संमेलने आयोजित करण्यात आली आहेत. यापैकी सर्वप्रथम मागाठणे विधानसभेच्या बुथ समिती कार्यकर्ता संमेलनात श्री. नाईक बोलत होते.

या वेळेस बोलताना श्री. नाईक पुढे म्हणाले, "केंद्रात भाजपा सरकार असताना खाजगी वनजमिनीवरील झोपड्या आम्ही तोडू दिल्या नव्हत्या. तसेच सत्तेचा उपयोग कसा करायचा हे आम्ही 26 जुलैच्या महापूरानंतर महानगरपालिकेच्या माध्यमातून केलेल्या उपाययोजनांद्वारे दाखवून दिले आहे. याउलट, उत्तर मुंबईचे सध्याचे खासदार श्री. गोविंदा यांची संसदेतील उपस्थिती केवळ 12 % आहे, रेल्वेच्या समस्या, मुंबईवरील हल्ले, अशा कोणत्याही विषयात यांनी संसदेत एकदाही तोंड उघडलेले नाही." कार्यकर्त्यांनी हे मुद्दे जनतेसमोर न्यावेत. बुथ पातळीवरही महिला, युवा, ज्येष्ठ नागरिकांचे संघटन केले पाहिजे, असेही यावेळी श्री. नाईक यांनी कार्यकर्त्यांना सांगितले.

या संमेलनाच्या सुरुवातीला भारतीय जनता पार्टीचे बोरीवली विधानसभेचे सरचिटणीस श्री. केसरी यादव यांच्या आकस्मिक निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात आला. त्यांच्या कामाच्या आठवणींना उजाळा देत भाजपा उत्तर मुंबई जिल्ह्याचे सरचिटणीस अॅड. जयप्रकाश मिश्रा यांनी,"एकंदर वातावरण भाजपाला अनुकूल असले, तरी फाजील आत्मविश्वासाने गाफील न रहाता कार्यकर्त्यांनी सतर्क रहावे, आपल्याला नेमून दिलेले काम चोखपणे करावे," असे आवाहन केले. उत्तर मुंबई जिल्हा कोषाध्यक्ष श्री. रामब्रीज यादव, मंत्री श्री. दिलीप पंडित, अनुसूचित जाती व जमाती मोर्चा अध्यक्ष श्री. गौतम पंडागळे यांचीही यावेळेस भाषणे झाली.

मागाठणे विधानसभेचे अध्यक्ष श्री. गणेश खणकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात येत्या आठवड्यात 8 मार्च रोजी दहिसर, चारकोप, बोरिवली विधानसभांच्या, तर 12 मार्च रोजी कांदीवली पूर्व या विधानसभांच्या बुथ समित्यांचे संमेलन होणार असल्याचे सांगितले. श्री. दिलीप उपाध्याय यांनी सूत्रसंचालन केले.

**(कार्यालय सचिव)**